Sem-I FYBMM (M) 24/11/16
CBSGS Effective Communication Skills Time: 11am to 1:30pm
(L)



Q.P. Code : 836900

## मराठी रुपांतर

(2½ तास) (एकूण गुण : ७५)

**सूचना :** १) सर्व प्रश्न अनिवार्य आहेत.
२) उजवीकडील संख्या गुण दर्शवतात.

१. कोणत्याही वृत्तवाहिनीसाठी 'बातमीदार' पदासाठी अर्जलेखन व स्वपरिचय पत्र तयार करा. १५

**किंवा**

संज्ञापन म्हणजे काय? संज्ञापनातील अडथळे सुयोग्य उदाहरणासहित स्पष्ट करा. १५

२. तुमच्या मित्र / मैत्रिणीला पुढील उच्चशिक्षणासाठी परदेशी शिष्यवृत्ती मिळाली आहे. त्याचे / तिचे अभिनंदन करणारे पत्र त्यांना लिहा. १५

**किंवा**

(अ) डावा व उजवा मेंदू यातील फरक लिहा. ०८

(ब) श्रवणकर्त्यांचे विविध प्रकार थोडक्यात लिहा. ०७

३ शाह इंडस्ट्रीजच्या ७२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना (Notice) कार्यक्रमपत्रिका (Agenda) व सभेचे कामकाज (Minutes) तयार करा. १५

**किंवा**

मौखिक संज्ञापन कौशल्य हे तुमच्या व्यक्तिमत्त्वाचा भाग आहेत. सुयोग उदाहरणासहित हे विधान स्पष्ट करा. १५

४. अनुवादाची प्रक्रिया व त्याची व्याप्ती स्पष्ट करा. १५

**किंवा**

पुढील उतारा हिंदी किंवा इंग्रजी भाषेत अनुवादित (भाषांतर) करा. १५

राजधानी आता प्रदूषणाच्या विळख्यात सापडली आहे. दिल्लीतील वायू प्रदूषणानं धोक्याची पातळी ओलांडली आहे. राजधानी अनेक ठिकाणी प्रदूषणाची पातळी ४० टक्क्यांनी वाढली आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर याचा विपरीत परिणाम झाला असून अनेकांना डोळे, घसा आणि नाकाचे विकार उद्भवू लागले आहेत. दरम्यान वाढत्या प्रदूषणावर सरकार नियंत्रण करण्यात अपयशी ठरल्यानं दिल्लीकर रस्त्यावर उतरले आहेत.

TURN OVER

पोस्टरच्या माध्यमातून दिल्लीकरांनी केजरीवाल सरकारला 'प्रदूषणावर उपाय शोधा - श्वासोश्वास घेण्यासाठि झाडे लावा' अशा प्रकारचे सल्ले दिले आहेत. दिवाळीनंतरच प्रदूषणात भरमसाट वाढ झाली आहे. प्रदूषणामुळे दिल्लीतील अनेक भागात धुक्याचं साम्राज्य पसरलं आहे.

दिल्ली सरकारनं नागरिकांना घराबाहेर न पडण्याचा सल्ला दिला आहे. एअर क्वालिटी इंडेक्सच्या मते दिल्लीतली वायू प्रदूषणाची गती तीव्रतेने वाढते आहे. दिवाळीनंतर वायू प्रदूषणाचा निर्देशांक मूल्य ४४५ हून ४८५ एवढा वाढला आहे. जवळपास दिल्लीच्या प्रदूषणात ४० टक्क्यांनी वाढ नोंदवली गेली आहे.

राजधानीत वाढलेले प्रदूषण आणि दाटलेल्या धुरक्यामुळे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी आज तातडीने बैठक बोलावली होती. या बैठकीत धुरक्यामुळे श्वास कोंडत असलेल्या दिल्लीच्या लोकांनी दिलासा देण्यासाठी तातडीच्या उपयांची घोषणा करण्यात आली.

दिल्ली सरकारच्या बैठकीत दिल्लीतील सर्व शाळा पुढचे तीन दिवस बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला तसेच पुढच्या ५ दिवसांपर्यंत दिल्लीत सुरू असलेल्या सर्व बांधकामांवर बंदी घालण्यात आली आहे. तसेच धूळ उडू नये म्हणून सोमवारी दिल्लीतील रस्त्यांवर पाण्याचा शिडकाव करण्यात येणार आहे. पुढचे १० दिवस दिल्लीत जनरेटर सुरू करण्यावर बंदी घालण्यात आली असून बदरपूर प्लँटसुध्दा पुढचे १० दिवस बंद ठेवण्यात येणार आहे. तसेच दिल्लीत कचरा जाळण्यावर बंदी घालण्यात आली असून १० नोव्हेंबरपासून दिल्लीतील रस्त्यांवर व्हॅक्युम क्लिनींग करण्यात येणार आहे. तसेच धुरक्यावर उपाय म्हणून कृत्रिम पाऊस पाडण्याच्या शक्यतेवर चाचपनी करण्यात आली.

दरम्यान दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी एकमेकांवर आरोप प्रत्यारोप करण्यापेक्षा या समस्येवर तोडगा शोधला पाहिजे असे सांगितले.

५. **खालीलपैकी कोणत्याही तीन टिपा लिहा:-** १५

(अ) जनसंज्ञापन

(ब) संज्ञापनातील संगणकाची भूमिका

(क) गट चर्चेचे महत्त्व

(ड) सृजनशील विचार प्रक्रिया

(इ) रेडिओ जॉकी

***************************